**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६३६३ /२०२३ दिनांक :- २९/१२ /२०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :-दिनांक ३१/१२/२०२३ रोजी पुणे कॅम्प (लष्कर) व डेक्कन परिसरातील वाहतुकीत करण्यात येणा-या बदलाबाबत.**

पुणे शहरातील लष्कर (कॅम्प) भागातील महात्मा गांधी रस्त्यावर तसेच डेक्कन वाहतूक विभागांतर्गत फर्ग्युसन कॉलेज रस्त्यावर दिनांक ३१/१२/२०२३ रोजी वर्ष अखेर व नूतन वर्षारंभचे आनंदोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरीकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर भागातील रस्त्यांवर वाहनांची मोठ्या प्रमाणात रहदारी वाढून वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. या परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतूक, पुणे शहर, लष्कर (कॅम्प) व डेक्कन परिसरातील वाहतूकीत बदलाबाबत **अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दि. ३१/१२/२०२३ रोजी १७.०० वा. पासून ते गर्दी संपेपर्यंत.** तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

➢ **महात्मा गांधी रोड, लष्कर (कॅम्प) परिसर :-**

१. वाय जंक्शन वरुन महात्मा गांधी रस्त्याकडे येणारी वाहतुक ही १५ ऑगस्ट चौक येथे बंद करुन ती कुरेशी मस्जिद व सुजाता मस्तानी चौकाकडे वळविण्यात येणार आहे.
२. ईस्कॉन मंदिर चौकाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, अरोरा टॉवरकडे जाणारी वाहतुक ही बंद करण्यात येणार आहे.
३. व्होल्गा चौकाकडून महंमद रफी चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक सरळ ईस्ट स्ट्रीट रोडने इंदिरा गांधी चौकाकडे सोडण्यात येईल.
४. इंदिरा गांधी चौकातून महावीर चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक इंदिरा गांधी चौकातून लष्कर पोलीस स्टेशन चौकाकडे वळविण्यात येईल.
५. सरबतवाला चौकाकडून महावीर चौकाकडे जाणारी वाहतुक बंद करण्यात येणार असून सदरची वाहतुक ताबूत स्ट्रीट मार्गे पुढे सोडण्यात येईल.

➢ **फर्ग्युसन कॉलेज रोड व जंगली महाराज रोड**

१. **फर्ग्युसन कॉलेज रोड** :- कोथरुड / कर्वेरोडकडुन येणारी वाहतूक खंडोजीबाबा चौक या ठिकाणी बंद करुन लॉ कॉलेज रोड, प्रभात रोड व अलका टॉकीज चौक मार्गे वळविण्यात येईल.
२. **जंगली महाराज रोड** :- जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक, गुडलक चौक व इतर लेनमधुन फर्ग्युसन कॉलेज रोडकडे जाणारी वाहतूक **आवश्यकतेप्रमाणे** झाशी राणी चौक या ठिकाणी बंद करुन पुणे महानगरपालिका, ओंकारेश्वर मंदिर व शिवाजी रोड मार्गे वळविण्यात येईल.

➢ **नो-व्हेईकल झोन(दिनांक ३१/१२/२०२३ रोजी १९.०० वा.ते दि.०१/०१/२०२४ रोजी ०५.०० वा.)**

१. **फर्ग्युसन रोड** :- गुडलक चौक ते फर्ग्युसन कॉलेज मेनगेट पर्यंत.
२. **एम.जी.रोड** :- १५ ऑगस्ट चौक ते हॉटेल अरोरा टॉवर .

**दि. ३१/१२/२०२३ रोजी वाहतुक शाखेतर्फे ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह बाबत विशेष मोहिम राबविण्यात येणार असुन मद्य प्राशन करून वाहन चालविणा-या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. सदर ड्रंक ॲण्ड ड्राईव्हची कारवाई करताना ब्लो पाईप (प्लास्टिक पाईप) हे कोरोना संसर्गाचा विचार करुन एका व्यक्तिसाठी एक पाईप (युज ॲण्ड थ्रो)वापरण्यात येणार आहे. प्रशासनाकडुन साथीच्या रोगापासुन बचाव करण्याची योग्य दक्षता घेण्यात येत आहे. तरी नागरीकांनी मद्य प्राशन करुन वाहन चालवु नये, असे आवाहन सर्वांना करण्यात येत आहे.**

**( विजयकुमार मगर )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- सर्व संबंधितांना